मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप आणि काँग्रेसकडून अजित पवार लक्ष्य!

## कथित टिडिआर घोटाळ्याप्रकरणी हिवाळी अधिवेशनात भाजपचे आमदार आक्रमक

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी ।**

**हिवाळी अधिवेशनात पिंपरी-चिंचवड चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. महापालिकेतील कथित हस्तांतरित विकास हक्क (टीडीआर) घोटाळ्यासह काँग्रेसच्या प्रदेश नेतृत्वाने महापालिका भ्रष्टाचारात क्रमांक एकवर असून, याम ध्ये आयुक्तांची महत्त्वाची भूमिका असल्याचा हल्ला करत अप्रत्यक्षपणे पुण्याचे पालकमंत्री असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांना लक्ष्य केले. तर, अजित पवार सत्तेत सहभागी झाल्यापासून अस्वस्थ असलेल्या भाजपच्या तिन्ही आमदारांनी प्रलंबित प्रश्नांसह नागरी समस्यांवर आक्रमक भूमिका घेत अस्वस्थतेला मोकळी वाट करून दिली. त्याच वेळी अजित पवार गटाच्या एकमेव आमदाराने मौन धारण केल्याचे दिसले.**

पिंपरी-चिंचवड शहर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला मानला जातो. मागील महापालिका निवडणुकीत भाजपने अजितदादांकडून सत्ता खेचून घेतली होती. मागील वर्षभर खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे जोमात होते. महापालिका प्रशासक त्यांच्याच कलाने कामकाज करीत होते. परंतु, महायुतीच्या सत्तेत सहभागी होत अजितदादांनी पुन्हा जम बसविला आहे. पुन्हा एकदा महापालिकेतील कारभारात पालकमंत्री अजित पवार यांचाच शब्द अंतिम मानला जाऊ लागला आहे. त्यामुळे भाजप आमदारांमध्ये अस्वस्थता निर्माण होणे साहजिक होते. परिणामी विविध प्रश्न विचारत प्रशासनाला अडचणीत टाकून



भाजप आमदारांनी अधिवेशनात अस्वस्थतेला मोकळी वाट करून दिल्याची चर्चा आहे. आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप यांनी अधिवेशनात मोठ्या प्रमाणात प्रश्न उपस्थित केले. जगताप यांनी राज्य सरकार आणि महापालिका प्रशासन अडचणीत येईल, असे काही प्रश्न उपस्थित केले. विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे यांनीही विविध प्रश्न उपस्थित केले. मात्र, अजित पवार गटाचे पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांचा विधिमंडळात आवाज निघालाच नाही.

रेडझोन हद्दीतील तळवडेतील कंपनीमध्ये झालेल्या स्फोट दुर्घटनेमध्ये १४ महिला कामगारांच्या झालेल्या मृत्यूवरून अधिवेशनात विरोधकांनी महापालिका प्रशासनाला धारेवर धरले. शहरातून वाहणा-या पवना, इंद्रायणी, मुळा या नद्यांची अवस्था गटारगंगेसारखी झाली. नद्यांचे वाढते प्रदूषण, पुनावळे येथील कचराभूमी प्रकल्प, रेडझोन हद्दीतील अनधिकृत बांधकामे, मोशीतील महापालिकेचे खेळाचे मैदान एका खासगी संस्थेला घोडेस्वारीसाठी मोफत दिल्याच्या विषयांवर अधिवेशनात जोरदार चर्चा झाली. याशिवाय महापालिका अधिका-यांसाठी भ्रष्टाचाराचे कुरण ठरलेले आणि सुशोभीकरणाच्या नावाखाली साडेसात वर्षांपासून बंद असलेल्या चिंचवड येथील बहिणाबाई प्राणिसंग्रहालयावर देखील चर्चा झाली. महापालिकेने आतापर्यंत १९ कोटींचा चुराडा केल्यानंतर राज्य शासनाने प्राणिसंग्रहालयाचा कारभार वनविकास महामंडळाकडे देण्याचा निर्णय घेतला.

### राज्यभरात पिंपरी-चिंचवड शहराची नाचक्की

**काँग्रेसचे नेते, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी कथित हस्तांतरित विकास हक्क घोटाळ्यावरून महापालिका प्रशासनाला धारेवर धरले. याचा सखोल तपास केल्यास आयुक्तांसह डझनभर अधिकारी घरी जातील, असा दा-वाही त्यांनी केला. महाराष्ट्र भ्रष्टाचारात जसा पहिल्या क्रमांकावर आला आहे. त्याच पद्धतीने पिंपरी-चिंचवड महापालिका भ्रष्टाचारामध्ये क्रमांक एकवर आहे. यामध्ये आयुक्तांची महत्त्वाची भूमिका असून, महापालिका भ्रष्टा-चाराचे केंद्र बनल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला. थेट विधिमंडळात महापालिकेतील भ्रष्टाचाराचे वाभाडे निघाल्याने राज्यभरात शहराची मात्र नाचक्की झाली.**

# ऐन लग्नात कोयता गँगची दहशत..!

## पंगतीतून दुचाकीने फिरण्यास मनाई केल्याने नवरदेवावर कोयत्याने वार

**पिंपरी । न्यूज एक्स्प्रेस मराठी ।**

कोयता फिरवून दहशत निर्माण करत 'आम्ही येथील भाई आहोत, आमच्या नादाला लागाल तर तुमची विकेट टाकीन' अशी धमकी दिल्याचा प्रकार चिंचवडमध्ये घडला. हळदी समारंभानंतर पंगतीतून दुचाकीवर ये-जा करण्यास मनाई केल्याने तिघांनी नवरदेवावर कोयत्याने वार केले. कोयता फिरवून दहशत निर्माण करत 'आम्ही येथील भाई आहोत, आमच्या नादाला लागाल तर तुमची विकेट टाकीन' अशी धमकी दिल्याचा प्रकार चिंचवडमध्ये घडला.

या प्रकरणी विजय राहुल तलवारे (वय २२, रा. काळेवाडी) सनी राजीव गायकवाड (वय २३, रा. पिंपरी), अनिकेत बापू बनसोडे (वय २४, रा. पिंपरी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत रोहित प्रकाश गायकवाड (वय २९, रा. श्रीनगर, रहाटणी) यांनी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. रोहित यांचा हळदी समारंभ शुक्रवारी सायंकाळी झाला. त्यानंतर व□हाडी जेवायला बसले. त्यावेळी आरोपी दुचाकीवरून पंगतीमध्ये ये-जा करीत होते. त्यांना मनाई केल्याने रोहितसोबत बाचाबाची करून आरोपी निघून गेले. थोड्या वेळाने कोयता व गज घेऊन आले.

रोहित यांचा मामेभाऊ शक्ती बनसोडे याच्यावर विजयने वार करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी रोहितने शक्तीला बाजूला ढकलले. रोहितच्या हातावर वार बसला. त्यामुळे ते जखमी झाले आहेत.



# लोणावळ्यात पर्यटकांचे पर्यटन जीवावर बेतणारे!

## दरीच्या संरक्षण जाळीवर बसून फोटोसेशन, पोलिसांचे दुर्लक्ष?

लोणावळ ।
न्यूज एक्स्प्रेस मराठी ।

लोणावळ्यात विकेंड आणि नाताळ सण साजरा करण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक दाखल झाले आहेत. टायगर आणि लायन्स पॉईंट या ठिकाणी देखील शेकडो पर्यटकांची गदी झाली आहे. पण, जीवावर बेतणारे पर्यटन पर्यटक करत असल्याचं लोकसत्ता ऑनलाइन प्रतिनिधींच्या कॅमे-यात कैद झालं आहे. लायन्स पॉईंट येथे खोल दरी असून संरक्षण जाळ्यावर बसून आणि उभे राहून पर्यटक फोटोसाठी पोज देत आहेत. ८०० ते १ हजार फूट खोल दरी आहे. तिथेच पर्यटकांचे जीवावर बेतणारे फोटोसेशन सुरू आहे.

लोणावळ्यात नाताळ सण साजरा करण्यासाठी मुंबई, पुणे आणि राज्याच्या कानाकोप-यातुन हजारो पर्यटक दाखल होत आहेत. लोणावळ्यात पर्यटकांची गर्दी झाली आहे. विकेंड आणि नाताळची सुट्टी सलग आल्याने पर्यटकांचा आनंद द्विगुणित झाला आहे. याच कारणाने पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावरील ठप्प झाल्याचं बघायला मिळालं.

दरम्यान, पर्यटक हे लायन्स पॉईंट आणि टायगर्स पॉईंट येथे निसर्गाच अनोखं सौंदर्य बघण्यासाठी गदी करत आहेत. सहकुटुंब आलेले पर्यटक स्वतः ची काळजी घेताना दिसत आहेत. मात्र, मित्र, मैत्रिणीसह आलेले तरुण आणि तरुणी जीवावर बेतणारे पर्यटन करत आहेत.

लायन्स पॉईंट इथे १ हजार फूट खोल दरी असून सुरक्षेच्या दृष्टीने लावण्यात आलेल्या जाळ्यावर पर्यटक उभे राहून आणि बसून पोज देत फोटोसेशन करत आहेत. अशा ठिकाणी लोणावळा शहर पोलीस दिसत नाहीत. आधीच लोणावळ्यातील वाहतूक कोंडीमुळे पोलीस मेटाकुटीला आ-लेले आहेत. अशात आता पर्यटक अशा पद्धतीने बेजबाबदार वागताना दिसत आहेत.



## तर त्या दिवशी सर्व खासदारांचा कार्यक्रमच झाला असता: सुप्रिया सुळें

पुणे ।
न्यूज एक्स्प्रेस मराठी ।

खासदार सुप्रिया सुळे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. खासदारांवर झालेल्या निलंबनाच्या कारवाईचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समर्थन केलं, असा प्रश्न सुप्रिया सुळे यांना विचारण्यात आला. त्यावर भाष्य करताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, ङ्गअजित दादा यांनी समर्थन केलं. ते सरकारचे अविभाज्य भाग आहेत. मी स्वतः त्याठिकाणी लोकसभेत होते. आम्ही लोकसभेत घो-षणा दिलेल्या नव्हत्या. जर त्या माणसाच्या हातात बॉम्ब असता तर त्या दिवशी सर्व खासदारांचा कार्यक्रमच झाला असता. एखादा माणूस उडी मारून येतो, या देशाची सुरक्षेची जबाबदारी कोणाची?



कांद्याला भाव आम्ही मागितला तसेच संसदेवरील हल्ला झालेल्या प्रश्नावर आम्ही बोललो. आता संसदेत नक्की काय झालं याची माहिती दादांना नसेलङ्क, असेही त्यांनी म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार बारामती लोकसभा जागेवर उमेदवार देणार आहेत, असा प्रश्न खासदार सुळे यांना विचारण्यात आला. त्यावर राज्यात लोकशाही आहे, दिल्लीत दडपशाही आहे, असे उत्तर त्यांनी दिले. शरद पवार, राहुल गांधी, सोनिया गांधी, उद्धव ठाकरे यांच्याशी दिल्लीत चर्चा झाली आहे. येत्या १५ दिवसांत जागा वाटपा संदर्भात माहिती मिळेल, असेही त्यांनी माध्यमांना सांगितले.

## पिंपरीत पार्क केलेल्या २० दुचाकी जळून खाक; आग लावली गेली का?

पिंपरी ।
न्यूज एक्स्प्रेस मराठी ।



चिंचवडमध्ये मध्यरात्री इमारतीच्या पार्किंगमधील वीस दुचाकी जळून खाक झाल्या. यात स्थानिक रहिवाशांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पिंपरी- चिंचवडमधील विठ्ठल नगर वसाहत बिल्डिंग नंबर ५ या ठिकाणी ही घटना घडली आहे. अद्याप आगीचे कारण समजू शकलेले नाही. पिंपरी- चिंचवड शहरातील विठ्ठल नगर या भागात बिल्डिंगच्या पार्किंगमध्ये पार्क केलेल्या २० दुचाकी जळून खाक झाल्या आहेत. ही घटना मध्यरात्री सव्वा एकच्या सुमारास घडली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे वाहन घटनास्थळी पोहोचले, अवघ्या १५ ते २० मिनिटांत अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, या घटनेत स्थानिक रहिवाशांच्या २० दुचाकी वाहने जळून खाक झाल्याने मोठं आर्थिक नुकसान झालं आहे. अद्याप आग लावली गेली का? की, आग लागण्याचे इतर कारण आहे, हे समजू शकलेले नाही.

## ३५ तासानंतर मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडी सुटली...!

पुणे ।
न्यूज एक्स्प्रेस मराठी ।

गेल्या तीस ते पस्तीस तासापासून जाम झालेला मुंबई पुणे यशवंतराव चव्हाण एक्स्प्रेस वे अखेर मोकळा करण्यात पोलिसांना यश आले आहे. बोरघाटामधील वाहतूक कोंडी फोडण्यास रायगड पोलिसांना यश आले आहे. वाहतूक कोंडी सुटल्याने वाहन चालकांनी देखील सुटकेचा निःश्वास सोडला आहे. रायगड महामार्ग पोलिसांकडून मुंबईहून पुण्याला येणारी लेन आणि पुण्याहून मुंबईला जाणारी लेन या दोन्हीही लेनवर मुंबई कडून येणारी वाहतूक सुरू केल्याने बोरघाटातील वाहतूक कोंडी नियंत्रणात आली आहे.

### छोट्या गाड्यांची संख्या अधिक

**सलग सुट्या असल्याने अनेकजण आपल्या कुटुंबासह फिरण्यासाठी बाहेर पडले मात्र, त्यांना द्रुतगती महामार्गावर तासनतास अडकून बसावे लागले. त्यामुळे मोठा मनस्ताप नागरिकांना सहन करावा लागला. ज्यांच्यासोबत लहान मुले आहेत त्यांचे मोठे हाल झाल्याचे पहायला मिळाले. मात्र पोलिसांनी केलेल्या मेहनतीमुळे वाहतूक कोंडी सोडवण्यात अखेर यश आले आहे.**

सलग सुट्ट्या आल्याने मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावर वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली होती. शनिवारी रात्री तर १० ते १२ किमीचा रांगा लागल्या होत्या. त्यात महामर्गावर अनेक वाहने बंद पडल्याने मोठ्या.वाहतूक कोंडीचा सामना नागरिकांना सहन करावा लागला. वाहतूक कोंडी झाल्यानं रात्रभर महामार्ग जाम झाला होता.

डब्यात चढताना महिला लेकरांसह रुळांवर पडली; तितक्यात ट्रेन सुटली, सगळ्यांनी श्वास रोखला मात्र रायगड महामार्ग पोलिसांनी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अथक प्रयत्न केले.

